# भारताचा कायदेशीर आराखडा: व्यवसाय सुलभता, एमएसएमई सक्षमीकरण आणि गुंतवणूक-मित्र सुधारणा यांचा नवा युग

नागपूर दि.२७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- भारत आज कायदेशीर आणि नियामक क्षेत्रात मोठ्या परिवर्तनातून जात आहे. व्यवसाय सुलभता, एमएसएमई पुनरुज्जीवन, वादांचे जलद निराकरण आणि एम अँड ए (विलिनीकरण-अधिग्रहण) साठी सक्षम वातावरण तयार करणे हे सुधारणा कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी आहे.''भारताचा कायदेशीर परिदृश्य: व्यवसाय सुलभता, एमएसएमई पुनरुज्जीवन आणि जबाबदार भांडवलाला चालना'''' या परिषदेसंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत एयू कॉर्पोरेट ॲडव्हायझरी आणि लीगल सर्व्हिसेसचे संस्थापक श्री. अक्षत खेतान यांनी उद्योजकता व गुंतवणूक वाढीस कायदे कसे हातभार लावत आहेत यावर भाष्य केले.

श्री. खेतान म्हणाले,''आज कायदा अडथळा नाही, तर व्यवसायाचा भागीदार आहे. आम्ही पारदर्शक, पूर्वनिश्चित आणि उद्योजक-मित्र कायदेशीर वातावरण निर्माण करण्यास वचनबद्ध आहोत.''कॉर्पोरेट गव्हर्नन्स, डिजिटल फाइलिंग, सुलभ पालन प्रक्रिया व जागतिक गुंतवणुकीस प्रोत्साहन देणाऱ्या तरतुदीमुळे भारत व्यवसायासाठी अधिक स्पर्धात्मक ठरत आहे. पत्रकार परिषदेत एमएसई क्षेत्रासाठी महत्त्वाच्या कायदेशीर उपक्रमांवर भर देण्यात आला:एमएसएमईडी कायद्यांतर्गत देयकांच्या वसुलीसाठी कठोर अंमलबजावणी, एमएसई फॅसिलिटेशन कौन्सिल्स आणि एमएसएमई समाधान यंत्रणेचा विस्तार, आयबीसी च्या पीपीआयआरपी प्रक्रियेने एमएसई पुनरुज्जीवनाला गती, एमएसई च्या क्षमता वाढीसाठी विलिनीकरण आणि अधिग्रहण व्यवहारांना प्रोत्साहन हे सर्व उपक्रम एमएसई ला अधिक मजबूत, तंत्रज्ञान-सक्षम आणि जागतिक स्पर्धेस तयार करतात.